: परिशिष्ट - १ :

# म. भा. भोसले यांची मुलाखत

**मी :-** आपण शिक्षण घेत असताना आपणावर कोणत्या गोष्टीचे संस्कार झाले ? त्यानंतर तुम्ही शिक्षक असूनही साहित्याकडे कसे वळलात ?

**म. भा. भोसले :-** मी सामान्य कुटुंबात जन्माला आलो असल्याने व माझ्या घरात सुशिक्षित कोणीच नसल्याने शिक्षण म्हणजे काय ? हेही सुरूवातीला मला माहित नव्हते. मी ज्या खेड्यात जन्मलो त्या खेड्यात प्राथमिक शाळाही नव्हती व इतर शैक्षणिक शक्तींचा वावरही नव्हता. त्यावेळी आमच्या गावात कृष्णा बापू नावाने शिक्षणाविषयी तळमळ असणारे गृहस्थ होते. त्यांनी गावातील मुलांच्यासाठी एक थोडाफार शिकलेला ब्राह्मण आणून शाळा सुरू केली पण बऱ्याच वेळा मास्तर टिकत नसल्याने ती शाळा बंद पडत असे. गावठी मास्तर आणून शाळा काढायला कृष्णाबापू कंटाळले तेव्हा त्यांनी दिपोटीची पाठ धरली आणि एकदा कायम स्वरुपाची शाळा त्यांना मिळाली तिथेच माझा पहिला धडा गिरविला गेला.

अशातच भिलवडीच्या शाळेत मी शाळा शिकू लागलो, पाचवीत गेलो असताना कृ. भा. बाबर हे माझ्या शाळेवर हेडमास्तर म्हणून आले. ते स्वतः लेखक होते. लहान मुलांसाठी त्यांनी बरेच लिहिले होते. त्याच बरोबर त्यांनी बालवाङ्मयाची पुष्कळ नवी पुस्तके आणून शाळेत वाचनालय सुरू केले. मी त्यातील पुष्कळ पुस्तके वाचली. तेव्हा पासून माझ्यात वाचनाची आवड निर्माण झाली. त्या वाचनाचा माझ्यावर नंतर इतका परिणाम झाला की मी शाळेत निबंध लिहिले. एकदोनदा त्याला बक्षिसही मिळाले.

त्याच बरोबर माझी आई व वडील सुसंस्कृत नव्हते पण त्यांचे मन फार मोठे होते. त्यांची सद्भावना आदर्श होती आणि संस्कृती उच्च होती. त्यांनी

आयुष्यभर पुष्कळ कष्ट केले होते. तो वारसा तर मला मिळालाच आणि उच्च संस्कृतीच्या वारसाने माझा पिंड सद्भावनाशील बनला आणि संवेदनक्षम अंतकरणानेच मला लिहायची स्फूर्ती मिळाली. त्याच बरोबर लवकरच मी सातवी पास झाल्यानंतर ट्रेनिंग घेऊन मी लहान वयातच शिक्षक झालो.

शिक्षक असताना असेच एकदा मी सांगलीला गेलो होतो तेव्हा मला 'हिंदोळयावर' हे पुस्तक मिळाले. ते मी झपाटून वाचून टाकले आणि तिथून पुढे पुस्तके विकत आणून वाचनाचा सपाटा लावला. त्यानंतर मी 'किर्लोस्कर' या मासिकाचा वर्गणीदार झालो. मला फडके, खांडेकर परिचित झाले. याचा परिणाम मलाही काही सांगावे, लिहावे असे वाटू लागले. तेव्हा माझ्या एका शेतकरी मित्राचे शेजारच्या मुलीवर प्रेम बसले. ती दोघे एकमेकांना अनुरूप होती तरीही घरच्या विरोधामुळे त्यांचे लग्न होऊ शकले नाही. ती मुलगी दुसऱ्याच्या घरी नांदायला गेली याचा परिणाम माझ्या मनावर झाला आणि मी 'आजोबाची डायरी' ही पहिली कथा लिहिली. त्याचबरोबर असेच एकदा शिवाजी नावाचा माझा एक आवडता विद्यार्थी होता. त्याने अभ्यास केला नाही म्हणून मी त्याला शिक्षा केली तेव्हा दुसऱ्या दिवशी तो दुसऱ्या तुकडीत जाऊन बसला. याचे आतोनात दुःख मला झाले व त्या तळमळीनेच तो विद्यार्थी सूड घेतो या भावनेने मी 'सूड' ही कथा लिहिली. अशा प्रकारे मी साहित्याकडे वळलो.

**मी :-** आपणास ग्रामीण साहित्यंच लिहावे असे का वाटले ?

**म. भा. भोसले :-** मी मुळात शहरी संस्कृतीपासून अलिप्त असणारा, खेड्यातील जीवनाशी एकरूप होणारा, त्याच मातीत जन्मलेला एक सामान्य माणूस आहे. खेड्यातील माझ्या गावात राहताना मला जे अनुभव आले. मी जे जीवन जगत होतो . जे जीवन मी चोवीस तास अवलोकन करीत होतो. ज्या जीवनाबद्दल मला जिव्हाळा होता तेच मी लिहिण्याचा प्रयत्न केला कारण हे सर्व मी माझ्या खेड्यात अनुभवले आहे.

मी ज्या खेड्यात जन्मलो, तिथे वावरताना मी जे पाहिले, ते लिहिले. माझ्या लेखनातील सगळ्या कल्पना मला प्रत्यक्ष जीवनाच्या अनुभूतीतून मिळाल्या आहेत. त्या जोरावर कुठलीही अनुकुल परिस्थिती नसताना मी लिहू लागलो.

**मी :-** तुम्ही ज्या काळात लिहू लागला तो काळ कथा, कादंबरी या विषयाच्या दृष्टीने योग्य होता का ? व त्याला अनुसरुनच तुम्ही लिहिले काय ?

**म. भा. भोसले :-** मी ज्या काळात लिहू लागलो तो काळ कथा कादंबऱ्यांच्या दृष्टीने योग्य नव्हता. लोकांची वाङ्मयाकडे ओढ नव्हती. आपण फक्त पारतंत्र्यात आहोत व त्यातून मुक्त कसे व्हायचे याकडेच सामान्य माणसाचे लक्ष लागून राहिले होते. या काळातच मी शिक्षक झाल्याने वाचनाच्या आवडीने माझे वाचन वाढले होते. जेव्हा मी खांडेकरांच्या कथा-कादंबऱ्या वाचल्या तेव्हा साहित्यात पांढरपेशी जीवनाचे चित्रण मला जास्त प्रमाणात वाचायला मिळाले. पण मी जे लिहिले ते त्याला अनुसरुन लिहिले नाही तर समाजासमोर काहीतरी आदर्श निर्माण करण्यासाठी लिहिले. ग्रामीण चित्रण त्यांच्या डोळ्यासमोर ठेवण्यासाठी लिहिले. मी ज्यावेळी खेड्यातले जीवन वाङ्मयात आणले तेव्हा वि. स. खांडेकरांच्याकडून त्याचे फार कौतुक झाले व त्यांनी 'पड्द्यावर चमकणारा प्राथमिक शिक्षक' या शीर्षकाखाली माझ्यावर 'मनोहर' मध्ये लेख लिहिला.

**मी :-** तुमच्या साहित्यात कोणत्या प्रदेशाचे, तेथील अनुभवांचे, संस्काराचे चित्रण झाले? त्या साहित्याची वैशिष्ट्ये कोणती ?

**म. भा. भोसले :-** माझ्या साहित्यात विशिष्ट असा एक म्हणून प्रदेश चित्रित झालेला नाही व तो चित्रित झालेला आहे असे मी म्हणणार नाही. पण शहरापासून दूर असणारा, आपली सांस्कृतिक व जीवनविषयक मूल्ये हरपलेला असा हा माझा खेड्यातला समाज तोच माझा प्रदेश. सर्वत्र उपेक्षेचे वातावरण मला काही काळ भेडसावत होते,

त्या माझ्या दक्षिण सातारा जिल्ह्याच्या परिसराचे चित्रण मी केले. तेथील मला आलेले अनुभव जिवंत होते.

तेव्हा मी ज्या परिसरात राहतो त्या आजूबाजूच्या जीवनातूनच मी कथाविषय निवडले. त्याचेच संस्कार माझ्या मनावर जास्त प्रमाणात झाले. ग्रामीण जीवनाचे वास्तवपूर्ण चित्रण करणे, त्या परिसरातील माणसांच्या दु:खी असह्य वेदना, त्यांचे संघर्षमय जीवन, मुक्या प्राण्यावरील त्यांचे प्रेम, उपेक्षितांच्या बद्दल असणारी सहानुभूती, त्या ग्रामीण परिसरात वावरणाऱ्या माणसांचे मन, त्यांचे दारिद्र्य या साऱ्या गोष्टी मी लिहिलेल्या ग्रामीण साहित्यातून चित्रित झाल्या आहेत. आणि वाचकांना त्या आवडल्या आहेत.

**मी :-** ग्रामीण साहित्य इतर साहित्यापेक्षा कसे वेगळे आहे ?

**म. भा. भोसले :-** साहित्यातून खऱ्या अर्थाने मानवी मनाचे मुक्तपणे चित्रण झालेले असते. त्यांच्या भावना त्यातून योग्य प्रकारे चित्रित होतात. तर या जीवनाचे असंख्य प्रश्न साहित्यातून आजपर्यंत मांडले गेले आहेत. प्रत्येक साहित्य हे एका विशिष्ट वर्गापुरते साहित्य आजपर्यंत मानले गेले आहे.

त्याच प्रमाणे ग्रामीण साहित्य हे या विशिष्ट वर्गापेक्षा वेगळे साहित्य आहे. शहरापासून दूर. सर्व सोयीपासून अलिप्त व आपले स्वत:चे जीवन स्वत:वर अवलंबून असणाऱ्या या माणसाचे हे साहित्य आहे. ग्रामीण जीवनातून फुलणारे ते ग्रामीण साहित्य. कृषिसंस्कृती हा ग्रामीण व्यवस्थेचा पाया. शेतकरी शेतात राबून काबाडकष्ट करणारा. त्याच्या भोवती बारा बलुतेदारांचे रिंगण अशी ही ग्रामसंस्कृती. याचे चित्रण ग्रामीण या विशेषणाखाली मोडले जाते. त्यामुळे इतर साहित्यापेक्षा ते वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण मानले जाते.

**मी :-** आपले साहित्य त्या काळात विशेष लोकप्रिय का झाले ?

**म. भा. भोसले :-** शहरी भाग हा ग्रामीण भागापेक्षा तुलनेने कमी असणारा भाग पण आजपर्यंत त्याचेच चित्रण जास्त स्वरुपात साहित्यातून झाल्याने ग्रामीण साहित्याकडे दुर्लक्ष झाले.

मी ज्या काळात लिहिले त्या काळात कथा व कादंबऱ्या काहीतरी निमित्ताने त्या सर्वापर्यंत पोहचल्या. त्या त्यांना फार आवडल्या. कारण मी माझ्या अनुभवात येणाऱ्या साऱ्या प्रसंगांना साहित्यातून हाताळले. 'रक्ताचं नातं' हे माझे नाटक एका कौटुंबिक जीवनाचे चित्रण घडविते. त्याच्या सहा आवृत्या निघाल्या. ते सर्वांना फार आवडले. 'उघड्या जगात' या कादंबरीवर 'जिवाचा सखा' हा चित्रपट निघाला. त्यामुळे घराघरापर्यंत एका कौटुंबिक जीवनातील प्रेमाचे चित्रण पोहचले. परिणामी माझ्या साहित्याला लोकप्रियता मिळत गेली. वाचकांचे उदंड प्रेम मिळाले.

त्याच बरोबर उत्सुकता वाढविणारे कसब कथा लेखनात मी कसोशीने राबविण्याचा प्रयत्न केला तेव्हा कथेच्या यशस्वीतेला ते मोठे पूरक ठरले. मी माझ्या साहित्यातून वास्तव जीवनाला जास्त प्राधान्य दिले त्यामुळे वाचकांना तो अनुभव आपलाच आहे असे वाटले व त्यांना ते आवडले त्यामुळे ते लोकप्रिय झाले.

**मी :-** आपल्या साहित्याचे समीक्षकांनी कसे कौतुक केले ? तसेच त्यावर कोणती टीका झाली.

**म. भा. भोसले :-** मी जे लिहिले त्याला असे नवजीवन उत्साह देणारे ठरले. माझ्या साहित्याचे खरोखरच तोंड भरुन कौतुक झाले. 'खिल्लारी जोडी' या कथेचे मर्म शंकरभाऊ किर्लोस्कर यांनी जाणले. 'मुका मार' या कथेचे हस्तलिखित वाचून रघुवीर सामंतानी मला अभिनंदनाची तार पाठविली. 'समरांगण' कादंबरीला भाऊ वरेरकरांनी प्रस्तावना लिहिली. 'गार सावली' या माझ्या पहिल्या कथा संग्रहाला

श्री. के. क्षीरसागर यांनी प्रस्तावना लिहिली. त्याचबरोबर वि. स. खांडेकरांनी माझे कौतुक केले.

'नवयुग', 'मौज', 'धर्नुधारी', 'केसरी', 'लोकशक्ती' इ. नियतकालिकानी मला परिचय नसताना लिहिण्यासाठी उत्तेजन दिले.

खरे सांगायचे तर जे माझ्या साहित्याचे गुण जाणणारे होते त्यांनी माझे कौतुक केले. त्यात सर्वसामान्य माणसांचा जास्त उल्लेख करावा लागेल.

माझ्या साहित्यावर टीका ही तशी जास्त प्रमाणात झाली नाही. १९४८-४९ साली कुसुमावती देशपांडे यांनी 'मराठी कादंबरी' भाग-१ हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यांत त्यावेळच्या नामवंत कादंबऱ्यांचा उल्लेख झाला. पण माझी 'उघड्या जगात' ही कादंबरी त्यावेळी एवढी गाजूनही तिचा या ग्रंथात उल्लेख झाला नाही. तेव्हा मी 'मौज' या मासिकाला 'हे श्रेय तरी मिळवा' या शीर्षकाखाली एक पत्र लिहिले ते त्यांनी त्यावेळी छापले.

**मी :-** तुम्ही नाटकेही लिहिली आहेत ती कोणती ? ती गाजण्याची कारणे कोणती ?

**म. भा. भोसले :-** मी आजपर्यंत कथा व कादंबरी बरोबर नाटक हा वाङ्मय प्रकार ही हाताळला आहे. मी एकूण तीन नाटके लिहिली. 'रक्ताचं नातं', 'लाडकी लेक' व 'पतीचा खून.' त्याच बरोबर काही एकांकिका ही लिहिल्या आहेत.

मी लिहिलेली नाटके गाजली याला कारण त्यातून मी ग्रामीण माणसाच्या जीवनाचे समरसतेने चित्रण केले आहे. मी खेड्यात राहात असल्याने कौटुंबिक अनेक प्रश्न व प्रसंग मी पाहिले व ते नाटकातून मांडले त्यामुळे अल्पावधितच त्याला यश मिळत गेले.

**मी :-** वि. स. खांडेकर यांच्याविषयी आपल्या मनात आदर आहे. त्यांचा संस्कार आपल्यावरती कसा झाला ? त्यांच्याविषयी आपणास काय वाटते ?

**म. भा. भोसले :-** माझ्या संपूर्ण साहित्यावर वि. स. खांडेकरांची कृपादृष्टी आहे. मुळात मी त्यांच्या कथा, कादंबऱ्यांचा वाचक आहे. माझी 'समरांगण' कादंबरी गाजल्यानंतर 'उघड्या जगात' या कादंबरीचे हस्तलिखित माझ्याकडे सहा वर्षे पडून होते. त्यावेळी अनेक नामवंताना मी ते हस्तलिखित दाखविले पण कुणीही ते स्वीकारले नाही. तेव्हा मी ती कादंबरी स्वत: प्रकाशित केली. त्यानंतर खांडेकरांना ती वाचण्यास दिली तेव्हा त्यांनी वामनराव कुलकर्णी यांना ती वाचण्यास देऊन त्यावर 'जिवाचा सखा' चित्रपट निघाला.

एकंदरीत खांडेकरांची माझ्यावर कृपादृष्टी आहे. बऱ्याचवेळा माझ्यावर येणाऱ्या बऱ्यावाईट प्रसंगासाठी ते धाऊनआले आहेत. माझ्या साहित्याचे खरे कौतुक त्यांनी केले. त्यामुळे, एका ध्येयवादी कादंबरीकारा बद्दल मला मनात आदर आहे.

वाङ्मयाची पारख करणारे खरे रसिक कोण असतील तर ते वाचक. खांडेकरांनी माझ्या साहित्याबाबत वाचकाची भूमिका स्वीकारली. त्यामुळे एक मोठा साहित्यिक माझ्यासारख्या एका खेड्यात राहणाऱ्या लेखकाला जवळ करतो, त्याचे कौतुक करतो या विषयी मला त्यांच्याबद्दल अभिमान आहे.

**मी :-** एकूणच ग्रामीण कथेत आपले स्थान काय ?

**म. भा. भोसले :-** मराठी ग्रामीण कथेत आतापर्यंत एकूण सात कथासंग्रह लिहून मी साहित्याची सेवा केली आहे. या बाबत सांगायचे तर माझ्या कथेचे ग्रामीण कथेत स्थान महत्त्वपूर्ण आहे. पण मराठी साहित्य वर्तुळात तिचे स्थान नाही. याचे कारण नवकथेच्या अगोदर मी प्रभावी ग्रामीण कथा लिहिण्याचा प्रयत्न केला. ग. प्र. प्रधान यांनी

माझ्या साहित्याचा अवर्जुन उल्लेख केला आहे. ग्रामीण साहित्यवर लिहिण्याचा पहिला प्रयत्न भोसले यांनी केला आहे असे प्रधान यांनी म्हटले. यातच माझी कथा काय आहे हे वाचकांना समजले.

**मी :-** आजच्या ग्रामीण साहित्यासंबंधी आपले मत काय ? त्याच्या विकासाच्या दिशा कोणत्या ?

**म. भा. भोसले :-** आज ग्रामीण साहित्य म्हणावे तितके निर्माण होत नाही ही खंत आहे. १९६० नंतर आनंद यादव, चारुता सागर, सखा कलाल यासारख्या कथाकारांनी कथा लिहिण्याचा प्रयत्न केला. त्यांना प्रचंड यश मिळत गेले. आमच्या काळात ज्या प्रकारे साहित्याचा दर्जा ठरविला गेला तो आज ठरविला जात नाही. आज निव्वळ ग्रामीण साहित्यिक नाहीत. ग्रामीण कथा लिहून इतर काही धरतीवर आत्मचरित्रात्मक लिहिण्याचा प्रयत्न आजचे साहित्यिक करतात.

माझ्या मते ग्रामीण साहित्य म्हणून निराळा असा भाग आज राहिला नाही. ग्रामीण आणि शहरी साहित्य आज एक झाले आहे. कारण आज खेडीच शहरे बनत आहेत. म्हणून ग्रामीण भाग निराळा वाटतो पण तो वेगळा नाही.

**मी :-** एवढे लिहून आपण उपेक्षित राहिलात असे म्हटले जाते. ते कितपत खरे आहे ?

**म. भा. भोसले :-** मी माझ्या 'नांदाय जाते' या दुसऱ्या कथा संग्रहात 'मी जे लिहिलं' या शीर्षकाखाली माझी लेखन विषयक भूमिका स्पष्ट केली आहे. 'समरांगण' या कादंबरी नंतर माझ्या साहित्याला एकही प्रकाशक मिळाला नाही. 'उघड्या जगात' या कादंबरीला बरेच वाईट दिवस आले कारण चांगल्या कथेचे मर्म जाणण्याची अक्कल कुणाकडे ही नव्हती. असे बरेच अनुभव मला आले.

साहित्यावर अधिराज्य गाजवणाऱ्या काही मोजक्या साहित्यिकांनी व समीक्षकांनी माझे कौतुक केले पण बऱ्याच वेळा वाईट अनुभव आले.

मी उपेक्षित आहे असे मला वाटत नाही. कारण माझ्या साहित्यावर वाचकांनी अपार प्रेम केले. त्यांनी माझ्या साहित्याचे कौतुक केले. तशी असंख्य पत्रे आजपर्यंत मला आली आहेत. त्यामुळे माझ्या साहित्याकडे कोण कोणत्या दृष्टीने पाहतो याचा विचार मी करीत नाही. तर समाजाला नक्की काय हवे आहे याच विचार करून मी समाजाला माझ्यापरीने देण्याचा प्रयत्न केला आहे.

**मी :-** आपल्या जीवनासंबंधी आपणास काय वाटते ? आपले जीवनाचे तत्त्वज्ञान काय ? वाचकांना आपण जीवनासंबंधी काय सांगू इच्छिता ?

**म. भा. भोसले :-** मी माझ्या आयुष्यात बरेच सुखदुःखाचे प्रसंग अनुभवले आहेत. तेव्हा त्यातून प्रवास करताना मला कांही चांगले व कांही वाईट ही शिकायला मिळाले. मी जीवनात एक शिक्षक म्हणून वावरलो व लिहिले. यातच मी पूर्ण समाधानी आहे. घरातील सर्वांनी कष्ट केले त्याचे फळ त्यांना मिळाले. मी शिक्षक असताना साहित्यासाठी कष्ट केले त्याचे श्रेय मला मिळाले यातच मला आनंद आहे.

खरे म्हणजे मी आजपर्यंत सत्याने जगत आलो आहे. माणसाने उत्तम तऱ्हेने जगावे. स्वत:चे जीवन यशस्वी करावे असे मला वाटते. वाचकानी ग्रामीण साहित्य निराळे समजून वाचू नये. जीवन रास्त मार्गाने नेऊन आदर्श जीवन जगण्याचा त्यांनी प्रयत्न करावा व आपल्या जीवनातून दुसऱ्यांनी काहीतरी आदर्श घ्यावा असे वाचकानी काहीतरी करावे असे वाटते. खून, दरोडे, मारामाऱ्या हे वाईट आहे अशा प्रकारचे लिहिलेले साहित्य वाचले तर निश्चितच त्याचा मनावर परिणाम होतो. तेव्हा वाचकानी कोणतीही गोष्ट जाणीव ठेऊन करावी असे मनोमन वाटते.

****

: परिशिष्ट - २ :

## संदर्भ सूची


फडके ना. सी. 'प्रतिभा साधन'.

डॉ. कोत्तापल्ले नागनाथ - 'ग्रामीण साहित्य स्वरुप आणि शोध'

डॉ. यादव आनंद - 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या'

डॉ. नलगे चंद्रकुमार - 'ग्रामीण वाङ्‌मयाचा इतिहास'

प्रा. सरदेसाई लक्ष्मणराव - 'रत्नाकर' मासिक आक्टोबर - १९३२ -ग्रंथ परीक्षण

डॉ. फडके भालचंद्र - 'मराठी कथेची वाटचाल' (अप्रकाशित) -प्रबंध

भोसले म. भा. - 'नांदाय जाते' - 'मी जे पाहिलं' - प्रकरण

भोसले म. भा. - 'कथा जन्माची कथा' - प्रस्तावना

खांडेकर वि. स. - 'मनोहर' - १९४९

कुलकर्णी के. ना. - 'दै प्रकाश' - ४ फेब्रु १९५१ परिक्षण

भोसले म. भा. 'ग्रामीण कथा' - कथासंग्रह

भोसले म. भा. 'अहवे लेणं' - कथासंग्रह

'लोकसत्ता'- मुंबई - ९ सप्टें १९६२- परीक्षण

'विशाल सह्याद्रि' - पुणे - ७ जुलै १९६३ - परीक्षण

मुलाटे वासुदेव - 'ग्रामीण कथा'

'मौज' -मुंबई -१३ फेब्रु. १९६२

क्षीरसागर श्री. के. - 'गार सावली'- प्रस्तावना

'लोकमान्य' - मुंबई - २७ जुलै १९५६

'चिकित्सक'- बेलगांव - ८ जाने १९५२

कुलकर्णी के. ना. - साप्ताहिक 'संगम' १५ डिसें- १९५५

'चिकित्सक' - बेलगांव - ४ एप्रिल १९५०

****

## : परिशिष्ट - ३ :

# म. भा. भोसले यांचे वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| कादंबरी - | १. 'समरांगण' - १९४१ | प्रकाशन- दा. ना. मोघे स्कूल ॲन्ड कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर |
| | २. 'उघड्या जगात' - १९४७ | प्रकाशक - आनंदराव भोसले ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | ३. 'एका आईची लेकरं' - १९५१ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | ४. 'घसरगुंडी' - ३१ जाने १९६३ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | ५. 'कायापालट' - १५ ऑगस्ट १९६६ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| लघुकथा संग्रह - | १. 'गार सावली' - १९४८ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | २. 'नांदाय जाते' - १९४९ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | ३. 'अहेव लेणं' - नोव्हेंबर १९५१ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | ४. 'पाहुणेर' - १९५४ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | ५. 'पाझर' - १९५५ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | ६. 'ग्रामीण कथा' - १९६३ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | ७. 'कथा जन्माची कथा' - ४ जाने १९६३ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| नाटक - | १. 'लाडकी लेक' - १९४९ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | २. 'रक्ताच नातं' - १९५१ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | ३. 'पतीचा खून' - १९५३ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| चित्रपट - | 'जिवाचा सखा' - (कथा-'उघड्या जगात') | |

| | | |
|---|---|---|
| **नाटिका -** | १. 'जातीला जागा नाही' -१९५२ | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | २. 'नापास नगरी' - १९६० | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| | ३. 'नाट्य सप्तक' | ग्रामीण प्रकाशन, धनगांव |
| **बालविभाग -** | १. 'न यायच्या वाटेवर' | |
| | २. 'भिकारी राजपुत्र' | |
| **समाज शिक्षण -** | १. 'आमची वाडी' | |
| | २. 'काळीचा कोप' | |
| | ३. 'हातचा घांस' | |
| | ४. 'गुणवंताची लेक' | |
| **इतर -** | 1. 'चिमण चारा' | |
| | 2. 'आधुनिक वाङ्मय प्रकार' | |
| | 3. 'उगवते तारे' | |
| | 4. 'वालुबाई वाचनालय' | |

****